| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्र. ८५/२०१६ मधील**<br>**नि.क्र. २१ वरील आदेश**<br>**श्री. विठ्ठल रामा तेजम वि. श्री. धुळू जानू कोकरे, वगैरे.** |

प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकूमाचा आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ अन्वये, नि.क्र. २१ वर दाखल केलेल्या या अर्जाद्वारे वादी हे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहे. अर्जात नमुद कथन संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे विषद करता येईल. वादी कथन करतात की, सदर दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी वाद मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखताने हस्तांतरण केले आहे व सदरचे व्यवहार हे यातील वादीवर मुळीच बंधनकारक नाहीत. या हस्तांतरणाच्या अनुषंगाने वादीने वादपत्रातील परिच्छेद क्र. ८ नंतर नवीन परिच्छेद ८–अ मध्ये अर्जात नमुद मजकूर लिहिण्याची परवानगी मागितली आहे. तसेच याच अनुषंगाने वादपत्रातील अनुतोष मागणीचा परिच्छेद क्र. १० मध्ये १०(फ) असे नवीन उपपरिच्छेद अर्जात नमुद केल्यानुसार लिहिण्यास परवानगी मागितली आहे. वादी कथन करतात की, सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही, मात्र अशी दुरुस्ती करण्यास वादीस परवानगी दिली नाही तर, वादींचे अतोनात व कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादींची कोणतीच हानी होणार नाही. यास्तव, वादीने उपरोक्तप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे. अर्जासोबत वादीचे शपथपत्र जोडले आहे.

२. अर्जाच्या मलपुष्ठावर प्रतिवादींचा खुलासा सादर करण्यात आला आहे. प्रतिवादी कथन करतात की, वादीस दुरुस्त अनुतोष मागण्याचा अधिकार नाही व वादीचा वाद मिळकतीशी काहीएक संबंध नाही. त्यामुळे, प्रतिवादींनी वादीचा प्रस्तुत अर्ज निरसीत करण्याची विनंती केली आहे.

३. वादीतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. आर.पी. बांदिवडेकर यांचा व प्रतिवादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. एस.एस. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने म्हणजे यातील

प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी प्रस्तुत वाद प्रलंबित असताना केलेल्या वाद मिळकतीच्या हस्तांतरणाच्या अनुषंगाने वादी हे वादपत्रात दुरुस्ती मागत आहेत. वादीने अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ शपथपत्र दाखल केला असल्याने ते नाकारण्याचा मुळीच प्रश्न उद्भवत नाही. वादी हा प्रभुत्ववादी असल्याने दाव्यात प्रतिवादी व अनुतोष निवडीचे स्वातंत्र्य वादीस आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप मुळीच बदलणार नाही व ही दुरुस्ती मान्य केल्यास प्रतिवादींची फारशी हानी सुध्दा संभवत नाही. याउलट, या दुरुस्तीशिवाय दाव्याचे काम पुढे चालल्यास, पुढे जावून वादामध्ये व हुकूमनाम्याच्या बजावणीमध्ये क्लिष्टता निर्माण होवू शकते. या सर्व कारणांस्तव, वादीचा प्रस्तुत अर्ज मान्य होण्यास पात्र ठरतो. परिणामी, निम्न आदेश.

## आ दे श

नि.क्र. २१ वरील वादपत्र दुरुस्तीचा अर्ज मागणीप्रमाणे विनाखर्च मान्य करण्यात येत आहे.

वादीने या आदेश्याचा दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्तप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

Amrit Chandrakant Birajdar

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2019.10.16 16:02:43 +0530

दि.१५/१०/२०१९
चंदगड

**(अमृत चं. बिराजदार)**
दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 15/10/2019 |
| order signed by the P. O. on | 15/10/2019 |
| order uploaded on | 16/10/2019 |